# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १८/०७/२०२६ (शनिवार )

**मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी स्वत: तपास केलेल्या लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणामध्ये आरोपीस पाच वर्षे सक्तमजुरीची शिक्षा**

कोल्हापूर जिल्हयात कार्यरत असताना मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, तत्कालीन सहाय्यक पोलीस अधीक्षक, करवीर उपविभाग यांनी स्वत: तपास केलेल्या एका गंभीर गुन्हयात मा. न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवत शिक्षा सुनावली आहे.

सदर गुन्हा शिरोली एमआयडीसी पोलीस स्टेशन, जि. कोल्हापुर अंतर्गत घडला असुन दिनांक १०/०५/२०१७ रोजी यातील आरोपी नामे दाद्या उर्फ प्रितम आनंदा शिंदे, वय ३१ वर्षे, रा.गंगाराम नगर टोप, ता हातकणंगले याने पिडीत वय १० वर्षे हिच्यावर लैंगिक अत्याचार केला. सदर प्रकरणी आरोपीविरुद्ध शिरोली एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे अप क्रं ८२/२०१७ कलम ४५२, ४१७, ३४२, ३५४, ३७६(२),५११ भान्यासं सह कलम ७,८,९ (एम),१० लैंगिक अपराधापासुन बलकांचे संरक्षण ( पोक्सो ) २०१२ सहकलम ३ (१) (डब्ल्यु) (i) अनुसूचित जाती—जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या प्रकरणाचा तपास मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, तत्कालीन सहाय्यक पोलीस अधीक्षक, करवीर उपविभाग यांनी अत्यंत बारकाईने, शास्त्रोक्त पद्धतीने व प्रभावी पुरावे संकलित करून पूर्ण केला. तपासादरम्यान गोळा करण्यात आलेले ठोस पुरावे व सक्षम साक्षीदार यांच्या आधारे सरकारी पक्षा तर्फे सरकारी वकील श्री पि.जे जाधव यांनी प्रभावी युक्तिवाद केला. दिनांक १७/०७/२०२६ रोजी मा. श्रीमती ए. आय. पेरमपल्ली, अतिरिक्त सत्र न्यायाधीश तथा विशेष न्यायाधीश

**कोल्हापूर यांनी आरोपी दाद्या उर्फ प्रितम आनंदा शिंदे याला भा.द.वि. कलम ४५२, ४१७, ३४२, ३५४ ब, ३५४ आणि लैंगिक अपराधापासुन बलकांचे संरक्षण (पोक्सो) कलम १० अन्वये दोषी ठरवत ५ वर्षे सक्तमजुरी व रु. ५,०००/— दंड, दंड न भरल्यास आरोपीस १५ दिवस अतिरिक्त साधी कैद अशी शिक्षा सुनावली आहे.**

## यवतमाळ येथील तरूणीचे अपहरण करून खंडणी मागणाऱ्या आरोपीला अटक, पीडितेची सुखरूप सुटका.
## रामटेक पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखा यांची संयुक्त कारवाई

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात रामटेक पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखा यांनी संयुक्त कारवाई करत यवतमाळ येथून एका तरूणीचे अपहरण करून ५०,०००/— रुपयांची खंडणी मागणाऱ्या एका आंतरराज्यीय आरोपीला नगरधन रोडवर अटक केली आणि पिडीतेची सुखरूप सुटका केली आहे.

यवतमाळ येथील एका तरूणीचे एका अज्ञात इसमाने अपहरण केले होते. त्यानंतर आरोपीने पीडितेच्या वडिलांना तिच्याच मोबाईलवरून फोन करून ५०,०००/— रुपयांची खंडणी मागितली व न दिल्यास तिला जीवे मारण्याची धमकी दिली होती. या बाबत पिडीतेच्या वडीलांनी यवतमाळ पोलीसांना माहीती दिली. दिनांक १८/०७/२०२६ रोजी यवतमाळ पोलीसांकडुन सदर माहीती मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक,नागपुर ग्रामीण यांना प्राप्त झाली. सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेता मा. वरिष्ठ पोलीस अधीक्षक,नागपुर ग्रामीण यांनी श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक यांच्या नेतृत्वात रामटेक पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखा यांना तात्काळ कारवाईचे आदेश दिले.

**स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सायबर पोलीस स्टेशन नागपुर ग्रामीण यांच्या मार्फतीने तांत्रिक माहिती प्राप्त करून रामटेक पोलीसांना माहीती पाठविली. रामटेक पोलीसांनी आरोपीचा तात्काळ शोध घेवुन नगरधन रोडवरून जिशान अयुब अंसारी, वय २१ वर्षे, रा. बाबुबिघा, पोस्ट विषनपुरा, ता. चेरकी, जि. बुद्धगया, राज्य बिहार याला ताब्यात घेतले. पीडित तरूणीची सुखरूप सुटका करण्यात आली आहे. सदर प्रकरणाची सविस्तर माहीती यवतमाळ पोलीसांना देण्यात आली आहे.**

# केळवद पोलीसांच्या तत्परेमुळे बालविवाह लावुन दिलेल्या अल्पवयीन मुलीची सुटका, सात आरोपींविरुद्ध गुन्हा नोंद
# ८ आरोपी अटक

पोलीस स्टेशन केळवदः— **दिनांक १७/०७/२०२६ रोजी मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण आणि श्री सागर खर्डे, सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर यांच्या मार्गदर्शनात केळवद पोलीस स्टेशनने अत्यंत तत्परता व संवेदनशीलतेने कारवाई करत बालविवाह लावुन दिलेल्या अल्पवयीन मुलीची सुटका केली आहे.**

फिर्यादी अल्पवयीन मुलीच्या आईचे एका वकील नावाच्या व्यक्तीसोबत प्रेमसंबंध होते. पिडीतेच्या आईच्या प्रियकराने पिडीतेला आणि तिच्या आईला नागपुर येथे बोलाविले त्यानंतर तिथे एका खाला म्हणुन ओळखल्या जाणाऱ्या महीलेला भेटले. पिडीतेची आई,तिचा प्रियकर आणि त्याच्या साथीदारांनी संगनमत करून अल्पवयीन मुलीला मध्यप्रदेश येथील व्यक्तीशी विवाह लावून दिला. त्यानंतर मध्यप्रदेश येथे घेऊन जाण्याचा प्रयत्न करण्यात आला.

दिनांक १७/०७/२०२६ सदर पिडीने मुलीने केळवद पोलीस स्टेशन हद्दीतील मौजा रामपुरी फाटा येथे प्रसंगावधान राखून वाहन थांबविण्याचा बहाणा केला. वाहन थांबताच तिने तिच्या आईला जाब विचारला असता त्यांच्यात वाद सुरू झाला. त्यावेळी जवळच हजर असलेल्या केळवद पोलिसांनी हस्तक्षेप केला असता सदर मुलीने त्यांना संपुर्ण हकीकत सांगितली. पोलीसांनी सदर घटनेचे गांर्भिय लक्षात घेता पिडीत मुलीची तात्काळ सुरक्षित सुटका केली. सदर प्रकरणी कलम १४३ ,३(५) भान्यासं सह कलम ३,९,१० बालविवाह प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **नमुद प्रकरणी आरोपी क्रं १) राजेश गणपत बच्छांगी, वय ४३ वर्षे, रा. अचाना ता.जि धार, राज्य मध्यप्रदेश २) रवि रामप्रसाद यादव, वय २५ वर्षे, रा. अचाना ता.जि धार, राज्य मध्यप्रदेश, ३) रामप्रसाद नंदराम यादव , वय ५३ वर्षे, रा. अचाना ता.जि धार, राज्य मध्यप्रदेश ४) संजय रतन**

**परमार, वय ५० वर्षे, रा. कुवर्षी ता.जि. धार, राज्य मध्यप्रदेश ,५) दुल्हेसिंग गजबसिंग कच्छवा,वय ४३ वर्षे, रा गुणावत,जि धार आणि क्र ६) पिडीतेची आई यांना अटक करण्यात आली आहे. तसेच आरोपी क्रं ७) अजुन एक महीला आणि आरोपी क्रं ८) आरोपी वकील नाझीर शेख, रा. नागपुर यांना सुध्दा ताब्यात घेण्यात आले असुन अटकेची प्रक्रीया सरू आहे. पुढील तपास केळवद पोलीस करीत आहेत.**

## नागपूर ग्रामीण जिल्हयात पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी ( Station House Officer – SHO ) यांचे नेतृत्व विकास व क्षमता बांधणी प्रशिक्षण यशस्वीरित्या संपन्न

**मा. श्री. सदानंद दाते, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशानुसार तसेच मार्गदर्शनाखाली Centre for Police Research (CPR) यांच्या द्वारे राज्यातील पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्यांमध्ये प्रभावी नेतृत्व, कार्यक्षमता व नागरिकाभिमुख पोलीसिंग विकसित करण्याच्या उद्देशाने Station House Officer – SHO Leadership Development and Capacity Building Training Programme आयोजित करण्यात आला. नागपुर परिक्षेत्रासाठी या प्रशिक्षणाचे आयोजन नागपूर ग्रामीण जिल्हयात करण्यात आले असुन दिनांक १६/०७/२०२६ ते दिनांक १८/०७/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर ग्रामीण पोलीस दलाने या तीन दिवसीय प्रशिक्षणाचे उत्कृष्ट नियोजन व यशस्वी आयोजन केले.**

दिनांक १६/०७/२०२६ ते दिनांक १८/०७/२०२६ तीन दिवसांच्या कालावधीत आयोजित प्रशिक्षणामध्ये नागपुर परीक्षेत्रातील नागपुर ग्रामीण, वर्धा, चंद्रपुर आणि भंडारा जिल्हयातील पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी सहभागी झाले. प्रशिक्षणादरम्यान नेतृत्व विकास, संघ व्यवस्थापन, प्रभावी संवाद कौशल्य, नागरिककेंद्री पोलीसिंग, निर्णय क्षमता, समस्या निराकरण, परिवर्तनशील नेतृत्व (Transformational Leadership), कार्यस्थळावरील आव्हाने व त्यावरील उपाययोजना, तसेच आधुनिक पोलीस प्रशासन या विषयांवर मार्गदर्शक लीडरशिप ट्रेनर तज्ञ श्रीमती योगिनी जोशी यांनी मार्गदर्शन केले तसेच मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांनी सुध्दा सहभागी पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना मार्गदर्शन केले.

या प्रशिक्षणामध्ये सहभागी अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष चर्चासत्रे, गटचर्चा, केस स्टडी, अनुभवाधारित शिक्षण (Experiential Learning), Peer Learning, Self & Assessment, Audio&Visual Learning आणि Leadership Skills in Action या

विविध उपक्रमांद्वारे प्रशिक्षण देण्यात आले. पोलीस ठाण्याचे नेतृत्व अधिक परिणामकारक व लोकाभिमुख कसे करावे याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.या उपक्रमामुळे पोलीस ठाणे स्तरावरील नेतृत्व अधिक सक्षम होऊन नागरिकांना अधिक दर्जेदार, संवेदनशील व परिणामकारक पोलीस सेवा देण्यास मदत होणार आहे. तसेच पारदर्शकता आणि प्रभावी प्रशासकीय कार्यपद्धती विकसित करण्यास या प्रशिक्षणाचा लाभ होणार आहे.







# बकरी चोरीचे ४ गुन्हे उघड, ०१ आरोपी अटक, स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात दिनांक १७/०७/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सायबर पोलीस स्टेशन, नागपूर ग्रामीण यांच्या सहकार्याने तांत्रिक विश्लेषण, तसेच गोपनीय माहितीच्या आधारे तपास करून बकरी चोरीचे ४ गुन्हे उघड केले आहे.

पोलीस स्टेशन सावनेर येथील अप. क्र. ६८३/२६ कलम ३०३ (२) भा.न्या.सं. चे तपासादरम्यान सदर गुन्हयात बकरी चोरी साठी टाटा टियागो क्र. एम एच—३३/एसी ७४९० या वाहनाचा उपयोग झाल्याचे निष्पन्न करून वाहनाचा शोध घेतला असता, दिनांक १७/०७/२०२६ सदर वाहन हे पाटणसावंगी ते वाकीकडे जाणाऱ्या सावनेर हायवे रोड अंडरबायपास पुलाजवळ रोडचे कडेला उभे असल्याचे दिसुन आले. वाहनाजवळ उभे दोन इसम पोलीसांना पाहुन पळुन जावुन लागले.पोलीसांनी शिताफिने **आरोपी मयुर मारोती ओमकार, वय २३ वर्ष, रा. म्हाडा कॉलनी क्वार्टर नं. ८७८ इमारत क्र. १, कपील नगर नागपूर ह. मु. १४ मैल राधे राधे डेअरी जवळ,जयस्वाल बारचे मागे, ता. कळमेश्वर, जि. नागपूर** याला ताब्यात घेऊन त्याची व वाहनाची झडती घेतली असता वाहनाचे सिट व मागील भागात बकऱ्याचे केस व विष्ठा मिळुन आली. त्याचेकडे कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्यांनी त्यांच्या आणखी एका साथीदारांसह सावनेर, रामटेक, नरखेड, केळवद येथे बकरी चोरीचे गुन्हे केले असल्याची माहीती दिली. **आरोपीस अटक करण्यात आली आहे.**

**पोलीसांनी पंचासमक्ष १) गुन्हयात वापरलेले वाहन** टाटा टियागो क्र. एम एच—३३/एसी ७४९० **किंमती ४,००,०००/— रूपये २) चोरी केलेल्या बकऱ्या विक्री करून मिळालेले पैसे नगदी ९५,०००/— रूपये आणि इतर साहीत्य असा एकुण ४,९५,०००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**




## चोरीचे ०२ गुन्हे उघड, ०१ आरोपी अटक,
## स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात दिनांक १७/०७/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सायबर पोलीस स्टेशन, नागपूर ग्रामीण यांच्या सहकार्याने तांत्रिक विश्लेषण, तसेच गोपनीय माहितीच्या आधारे तपास करून १) अप क्र. ६४७/२६ कलम ३०३(२) भा.न्या.सं २) अप. क्र. ६४८/२६ कलम ३०३(२) भा.न्या.सं असे एकुण २ गुन्हे उघड केले आहे.

१) अप क्र. ६४७/२६ कलम ३०३(२) भा.न्या.सं, २) अप. क्र. ६४८/२६ कलम ३०३(२) भा.न्या.सं चे समांतर तपासादरम्यान सदर गुन्ह्यातील अज्ञात आरोपी यांचा शोध घेतला असता, गुन्हयातील **आरोपी नामे १) शुभम उर्फ विक्की अशोक शाहु, वय ३३ वर्ष, रा. सेनपती नगर, दिघोरी नागपुर** हा असल्याचे निष्पन्न करुन त्यास ताब्यात घेऊन त्याचेकडे कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्याने सदरचा गुन्हा त्यांच्या आणखी दोन साथीदार **२) वैभव उर्फ आरवी ओमप्रकाश राठोड, रा. चानी यवतमाळ, ह. मु. विनायक नगर, न्यु नरसाळा नागपुर, ३) शैलेश उर्फ काल्या पुरुषोत्तम राठोड, रा. सिध्देश्वर नगर, यवतमाळ** यांचेसह मिळुन हुंदाई कार क्र. एम एच—३१/डी के—००७८ याने पोलीस स्टेशन बोरी येथे

चोरीचे गुन्हे केले असल्याची माहीती दिली. गुन्ह्यात वापरलेले वाहन व गुन्ह्यात चोरी गेलेले १३ भारत गॅस सिलेंडर तसेच दोन ट्रकच्या बॅटरी हे कारसह सातगाव येथे सोडुन पळुन गेले आणि दुसऱ्या गुन्ह्यात सातगाव येथील चोरी केलेली बोलेरो वाहन क्र. एम एच—४०/ए सी—९०१० हे टेंभुर्डा फाटा चंद्रपुर रोड येथे डिझेल संपल्याने लावारिश स्थितीत सोडुन दिल्याबाबत कबुली दिली. **आरोपी क्र. ०१) यास अटक करण्यात आली आहे.**

**उघड झालेले गुन्हे**

१) अप क्र. ६४७/२६ कलम ३०३(२) भा.न्या.सं,

२) अप. क्र. ६४८/२६ कलम ३०३(२) भा.न्या.सं

## अवैध हातभट्टी दारू निर्मिती व विक्री विरोधात पाचगाव पोलीस व राज्य उत्पादन शुल्क विभागाची संयुक्त विशेष मोहीम चांपा पारधी बेडा येथे कारवाई करत ३ लाख २७ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त

पोलीस स्टेशन पाचगाव :— **दिनांक १८/०७/२०२६ रोजी नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध हातभट्टी दारू निर्मिती व विक्रीविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री. मयंक माधव, उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड उपविभाग यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री रविंद्र मानकर, प्रभारी अधिकारी, पाचगाव पोलीस स्टेशन पाचगाव पोलीस, दंगा नियंत्रण पथक, नागपुर ग्रामीण आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाने मौजा चांपा पारधी बेडा येथे संयुक्तपणे मोठी कारवाई करून रनिंग हातभट्टया नष्ट केल्या.**

**सदर घटनास्थळी धाड टाकुन आरोपी** १) प्रायुष प्रदीप पवार, वय १८ वर्ष, रा. चांपा, ता. उमरेड, जि. नागपूर २) राहुल उर्फ धर्मेद्र वरतास पवार, वय ३८ वर्ष, रा. चांपा, ता. उमरेड, जि. नागपूर तसेच **०२** महीला आरोपी यांचेवर कारवाई करत **रनिंग भट्टी नष्ट करून** घटनास्थळावरू मोहाफुल रसायन सडवा आणि मोहाफुल गावठी दारू लोखंडी ड्रम, प्लास्टीक ड्रम, जळाउ लाकुड आणि इतर साहित्य जप्त केले.

सदर कारवाईत पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष एकुण १) ७४०० लिटर मोहाफुल सडवा आणि २) ७० लिटर मोहाफुल गावठी दारू ३) प्लास्टीक आणि लोखंडी ड्रम ,जळाउ लाकुड, पाईप तसेच दारू गाळण्याचे इतर साहीत्य असा एकुण ३,२७,०००/— रूपयांचा माल जप्त केला. नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. नमुद आरोपी विरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ४ गुन्हे नोंदविण्यात आले आहे.





# खापा पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध दारू व्यवसायातील सराईत गुन्हेगारास नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

पोलीस स्टेशन खापा हदद्दीतील अवैध दारू व्यवसायातील सक्रिय **आरोपी अरविंद यादोराव खोब्रागडे, वय ५२ वर्ष, रा. नागलवाडी, ता. सावनेर, जि. नागपूर** यास महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये नागपुर ग्रामीण आणि जिल्हयातुन हद्दपार केले.

सराईत गुन्हेगार नामे आरोपी **अरविंद यादोराव खोब्रागडे, वय ५२ वर्ष, रा. नागलवाडी, ता. सावनेर, जि. नागपूर याचेवर** अवैध दारू बाबत एकुण ०३ गुन्हे **नोंद** आहे. नमुद आरोपींचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्यांचे वर कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी यानी आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपीच्या गुन्हेगारी कृत्यामुळे परीसरातील अनेकांना दारूचे व्यसन जडले आहे. तसेच त्यांच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे नमुद आरोपींचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव खापा पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर यांच्या मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, सावनेर यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून वर नमुद आरोपी **अरविंद यादोराव खोब्रागडे, वय ५२ वर्ष, रा. नागलवाडी, ता. सावनेर, जि. नागपूर यास १ महीन्यांकरीता नागपुर ग्रामीण आणि जिल्हयातुन हद्दपार केले आहे.**

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी हा नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.**



**हद्‌दपार आरोपी अरविंद यादोराव खोब्रागडे**

## मौदा पोलीस स्टेशन हद्‌दीतील अवैध दारू व्यवसायातील सराईत गुन्हेगारास नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

पोलीस स्टेशन मौदा हदद्‌तील अवैध दारू व्यवसायातील सक्रिय **आरोपी प्रकाश महादेव ढोक, वय ४० वर्ष, रा. मौजा भुगाव** यास महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये नागपुर ग्रामीण आणि जिल्हयातुन हद्दपार केले.

सराईत गुन्हेगार नामे आरोपी **प्रकाश महादेव ढोक, वय ४० वर्ष, रा. मौजा भुगाव याचेवर** अवैध दारू बाबत अनेक गुन्हे **नोंद** आहे. नमुद आरोपींचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्यांचे वर कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी यानी आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपीच्या गुन्हेगारी कृत्यामुळे परीसरातील अनेकांना दारूचे व्यसन जडले आहे. तसेच त्यांच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे नमुद आरोपींचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१)

(अ) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव मौदा पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान यांच्या मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, मौदा यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून वर नमुद आरोपी **प्रकाश महादेव ढोक, वय ४० वर्ष, रा. मौजा भुगाव यास १ महीन्यांकरीता  नागपुर ग्रामीण आणि जिल्हयातुन हद्दपार केले आहे.**

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी हा नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.**



**हद्दपार आरोपी प्रकाश महादेव ढोक**

# नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७३१ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

**मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक १८/०७/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील २३ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. एकुण ७३१आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :– नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुटिबोरी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :– उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४७ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २१ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २७ आरोपी, पोलीस स्टेशन पाचगाव १४ आरोपी अशा एकुण १३७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :–** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ५५ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३५ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे १५ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी अशा एकुण १३५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :– कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३४ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन वडोदा येथे १५ आरोपी अशा एकुण ६९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :–** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३३ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २४ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २६ आरोपी अशा एकुण ११५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ५८ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ५८ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३७ आरोपी अशा एकुण १८० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.




महाराष्ट्र पोलीस
पोलीस स्टेशन खापा
जि. नागपुर (ग्रा.)






पोलीस स्टेशन एम.आई.डी.सी. बुटीबोरी
दुरध्वनी क्रं: 07104-265135
जि. नागपुर ( ग्रा.)
महाराष्ट्र पोलीस
ऑर्बिट
वायर एण्ड केबल
www.orbitcables.com

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने